मनाला उचित विचारांची सवय लागली की उचित कृती आपोआप घडते.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १२ मार्च २०२५ | अंक ९३० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# महाराष्ट्रात येऊन राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्याना बंदी घालण्यासाठी सरकारचा निर्णय



**महाराष्ट्र सरकारने बांगलादेशी आणि रोहिंग्यांनी बनावट जन्म प्रमाणपत्रे वापरण्याच्या प्रकरणांवर कारवाई करण्यासाठी कडक नियम लागू केले आहेत. एक वर्षानंतर जन्म/मृत्यू नोंदणीसाठी अर्ज केल्यास, पुरेसे पुरावे नसल्यास फौजदारी कारवाई करण्यात येईल.**

गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रसह देशभरात घुसखोरी करुन राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्यांची संख्या वाढत चालली आहे. यामुळे महाराष्ट्रात घुसखोरी करुन राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्यांवर कारवाई केली जावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. आता महाराष्ट्रात बांगलादेशी व रोहिंग्यांनी सुरु केलेल्या हैदोसावर बंदी घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने दमदार पाऊल उचलले आहे. जन्म मृत्यू नोंदणी अधिनियमात अभूतपूर्व बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे बांगलादेशी आणि रोहिंग्यांना सहजासहजी उपलब्ध होणारे बनावट प्रमाणपत्र रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. बनावट जन्म प्रमाणपत्र घेऊन अनेक बांगलादेशी व रोहिंगे हे महाराष्ट्रात राहत आहेत. त्यांना बंदी घालण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र सरकारने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियमात अभूतपूर्व बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार जन्म अथवा मृत्यू होऊन एक वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाला असेल आणि त्यांच्या संबंधितांना ही प्रमाणपत्रे पाहिजे असतील, पण त्यासाठी जर सबळ पुरावे नसतील, तर अर्जदाराविरुद्ध थेट फौजदारी कारवाई केली जाणार आहे. जन्म-मृत्यू नोंदी घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० नुसार एका वर्षापेक्षा जास्त विलंबाच्या जन्म-मृत्यू नोंदी घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली. ज्या ठिकाणी जन्म झाला, त्या ठिकाणच्या नोंदी तपासून प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

## अर्जातील माहिती खोटी आढळली तर

जर नोंद चुकीची आढळली किंवा अर्जातील माहिती खोटी आढळली तर ग्रामसेवकापासून महापालिकेतील जन्म मृत्यू निबंधकापर्यंत सर्वांना कारणासह जन्म मृत्यू अनुपलब्धता प्रमाणपत्र द्यावे लागेल. या संबंधित अर्जाची तपासणी पोलिस विभागामार्फत होईल. यासाठी पोलिसांचा अभिप्राय बंधनकारक करण्यात आला आहे. तसेच जन्म मृत्यूच्या नोंदी घेण्याबाबतची प्रकरणे अर्ध-न्यायिक असल्याने अतिशय सूक्ष्म पद्धतीने हाताळायची आहेत, असे आदेशही देण्यात आले आहेत.

# पाकिस्तान ट्रेन हायजॅक १०४ ओलिसांची सुटका, बलूचे १६ दहशतवादी ठार

पाकिस्तानमधील बलोच आर्मीने संपूर्ण ट्रेनच हायजॅक केल्याच्या घटनेला आता १८ तास झाले आहेत. त्यानंतर अजूनही पूर्ण ओलिसांची सुटका झालेली नाही. पाकिस्तानमधील बलूचिस्तानमधील बलूच लिबरेशन आर्मीने (इङअ) मंगळवारी जाफर एक्सप्रेस ट्रेन हायजॅक केली होती. या ट्रेनमध्ये ४५० पेक्षा जास्त प्रवाशी होते. त्यात पाकिस्तान लष्कराचे जवान, अर्धसैनिक दलाचे जवान, आयएसआयचे कर्मचारी, पोलीस व सामान्य प्रवाशी होते. त्यातील सामान्य प्रवाशी आणि माहिला-मुलांना बलूच आर्मीने सोडून दिले. परंतु लष्कारातील जवान आणि आयएसआय कर्मचा-यांसह एकूण २१४ जणांना ओलीस ठेवले. बीएलएने पाकिस्तानच्या ३० पेक्षा जास्त सैनिकांची हत्या केल्याचा दावा केला आहे. दुसरीकडे पाकिस्तान लष्कराने १६ दहशतवाद्यांना ठार करुन १०४ जणांची सुटका केल्याचे म्हटले आहे.

सरकारला ४८ तासांचा अल्टिमेटम

बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने पाकिस्तान सरकारला ४८ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. सर्व बलुच राजकीय कैद्यांच्या सुटकेची मागणी केली आहे. तसेच बलुचिस्तानमध्ये कोणत्याही पाकिस्तानी एजन्सीचा किंवा सुरक्षा एजन्सीचा प्रतिनिधी नसावा ही बलुचांची सर्वात मोठी मागणी आहे. चीनसोबत सीपीईसी प्रकल्प सुरू आहे, तो बंद करण्याची मागणी बलूच आर्मीची आहे.




# वसंतदादा पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

पाटोदा : येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ११ मार्च मंगळवार रोजी एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या जैवविज्ञान संकुल व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मरिसेन्ट अडव्हान्सेस इन लाईफ सायन्सेस अँड मॉलेक्युलर बायोलॉजी फॉर रूरल डेव्हलपमेंटफ या विषयावर ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. परिषदेचे उद्घाटन सकाळी १०:०० वाजता संपन्न होईल. उद्घाटक म्हणून संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर या उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून केजच्या सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर गौतम पाटील हे उपस्थित राहणार आहेत. परिषदेचा समारोप सायंकाळी ४:०० वाजता संपन्न होईल. समारोप समारोहाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सहसचिव डॉ. योगेश क्षीरसागर हे उपस्थित राहणार आहेत. तर निमंत्रित अतिथी म्हणून धुळ्याच्या घोगरे विज्ञान महाविद्यालयाचे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रोफेसर दत्ता ढाले यांची उपस्थिती राहील. तरी या परिषदेस संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनीं उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक प्राचार्य आबासाहेब हांगे यांनी केले आहे

# महाराष्ट्राच्या विकासाचे स्वप्न साकारणारा लोकाभिमुख अर्थसंकल्प-पंकजा मुंडे

मु ंबई । प्रतिनिधी अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या दिशेने नेणारा आणि महाराष्ट्राच्या विकासाचे स्वप्न साकारणारा असून देशाला जागतिक अर्थव्यवस्थेत तिसऱ्या स्थानावर नेण्यासाठी महत्त्वाचा ठरणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करत पशुसंवर्धन, पर्यावरणीय व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मु ंडे यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे. विकासा बरोबरच रोजगार संधीवर भर देणारा अर्थसंकल्प असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधीमंडळात राज्याचा अर्थसंकल्प मांडला. यावर प्रतिक्रिया देतांना ना. पंकजाताई मुंडे यांनी हा अर्थसंकल्प शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती आणि सामाजिक विकास या पंचसूत्रीला चालना देणारा असल्याचे म्हटले आहे. शेती, शिक्षण, सिंचन, महिला, आरोग्य, पायाभूत सुविधा, शिक्षण, मनुष्यबळ विकास, दळणवळण, पर्यटन, सांस्कृतिक आणि उद्योग या सर्वच क्षेत्रासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे. शेतकरी, महिला, युवा, अनुसूचित जाती, आदिवासी, इतर मागासवर्ग, दिव्यांग या सर्व घटकांना अर्थसंकल्पात न्याय देण्यात आला आहे. लाडक्या बहिणी बरोबरच लाडका भाऊ देखील बेरोजगार राहू नये यासाठी वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून आत्मनिर्भर करण्याचा राज्य शासनाचा संकल्प आह

# बचत गटांच्या जिल्हास्तरीय नवं तेजस्विनी प्रदर्शन व विक्री महोत्सवास प्रारंभ



बीड : महिला व बाल विकास विभाग अंतर्गत असणाऱ्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिना सह जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित नवतेजस्विनी जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री महोत्सवाला आज प्रारंभ झाला. तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्योग डर्हीि प्रकल्पाच्या अंतर्गत छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे संयम साहित्य महिला बचत गटाद्वारे उत्पादित वस्तू व मालाचे विक्री आणि प्रदर्शन या ठिकाणी १२ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. याचे उद्घाटन अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते झाले यावेळी जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी सुभाष साळवे जिल्हा व बाल विकास अधिकारी फारुख शेख तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाची चे विभागीय सल्लागार संदीप मराठे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनात जिल्ह्यातील विविध उत्पादनांचे ५२ स्टॉल लावण्यात आले आहेत

# बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी : नवीन रेल्वेमार्ग सर्वेक्षणास निधी मंजूर

## धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वे मार्ग होणार, रेलबोर्डाचे चेअरमनसोबत खा.सोनवणेंनी केली ऑनलाईन पाहणी



बीडः उस्मानाबाद (धाराशिव)-बीड-औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) रेल्वे लाईन प्रकल्पाला मंजुरी देण्याची मागणी निवडून आल्यापासून खा. सोनवणे हे सातत्याने रेल्वेमंत्री व रेल बोर्डाकडे करत आहेत. या मागणीची दखल घेत रेल्वेमार्गाची तपासणी करण्याचे आदेश दि. १० फेब्रुवारी रोजी रेल्वे मंत्री यांनी संबंधित संचालकांना दिले होते. आता संबधित रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण करण्यास मंजूरी देण्यात आली असून सर्व्हेक्षणासाठी रु. ६ कोटी निधीस मंजुरीचे आदेश देण्यात आले आहेत. रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतिश कुमार यांच्या कार्यालयात खा.सोनवणे यांनी रेल्वे मार्गाची ऑनलाईन पाहणी केली. खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१० फेब्रुवारी रोजी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना भेट घेतली होती. यावेळी उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद नवीन मार्ग प्रकल्पाचा अहवाल रेल्वे बोर्डाला सादर करण्यात आलेला असून या प्रकल्पाची एकूण लांबी २४०.१५ किमी आहे. ज्याचा अंदाजे खर्च ४८५७.४७ कोटी रुपये असल्याचे निदर्शनास आणून दिले. मराठवाडा प्रदेशात अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि व्यापार आणि उद्योगासाठी नवीन मार्ग उघडण्यासाठी हा रेल्वे मार्ग महत्त्वाचा आहे, हे पटवून दिले होते. केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी पत्राव्दारे या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत प्रकल्पाची व्यवहार्यता व सुविधा तपासणी करण्याचे निर्देश संबंधित संचालक यांना दिले होते. यानंतर आता केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाने धाराशिव (उस्मानाबाद)-बीड-छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) या २४० किमी नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम सर्वेक्षणास मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी ६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा रेल्वे मार्ग मराठवाड्याच्या दळणवळणाच्या सोयींमध्ये मोठी क्रांती घडवेल आणि विकासाला गती देणार आहेच पण बीड जिल्ह्याच्या तसेच मराठवाड्याच्या प्रगतीसाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. हा रेल्वेमार्ग व्हावा, यासाठी खा.बजरंग सोनवणे हे जुलै २०२४ पासून (उस्मानाबाद) धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद) अशा २४० किलोमीटर नवीन रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी सातत्याने रेल्वे मंत्री व रेल बोर्डाकडे पाठपुरावा करत आहेत. आज मंगळवार दि.११ मार्च रोजी रेल बोर्डाचे चेअरमन सतिषकुमार यांचे सोबत या रेलमार्गाची ऑनलाईन पाहणी केली.

रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतिश कुमार यांच्या कार्यालयात रेल्वे मार्गाची ऑनलाईन पाहणी केली. रेल्वेमार्गाविषयी सविस्तर चर्चा केली. हा रेल्वेमार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्नशील राहील.
-खा.बजरंग सोनवणे, बीड.

### पाठपुरावा करावा तो खा.सोनवणेंनी: वाघ

खा.बजरंग सोनवणे यांना लोकसभा निवडणूकीत जिल्ह्यातील सुजान नागरिकांनी निवडून दिले, याचा मतदार व जिल्ह्यातील रहिवासी म्हणून अभिमान वाटत आहे. गेल्या वर्षभराच्या आतच त्यांनी बीड रेल्वेसाठी पाठपुरावा केला. आहिल्यानगर-बीड-परळी बंद असलेली कामे चालू करुन गतीने काम पूर्णत्वास जात आहे. नवीन रेल्वेमार्गासाठी देखील त्यांनी जो पाठपुरावा केला आहे, तो कमालीचा आहे. पाठपुरावा करावा तो खा.बजरंग सोनवणे यांनीच. याच पाठपुराव्याचे हे फळ आहे, अशी प्रतिक्रिया बीड येथील नागरिक शरद वाघ यांनी दिली आहे.

### बीडला मराठवाड्यातील सर्वात मोठे जंक्शन

पुर्व-पश्चिम रेल्वे मार्गाचे काम सुरू आहेच पण आता दक्षिण-उत्तर रेल्वेमार्गाचेही सर्वेक्षण होत असून या कामाला गती मिळेल. दोन्ही रेल्वे मार्ग झाल्यास बीडमध्ये मराठवाड्यातील सर्वात मोठे जंक्शन होणार आहे. अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गाबरोबरच धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्गही बीड जिल्ह्यासाठी विकासाच्या दृष्टीने मोठा फायदेशीर ठरणार आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १२ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन!

९ मार्च २०२५ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी मिनी वर्ल्डकप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर चार गडी राखून विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफीवर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास घडवला. यावेळची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई या देशात खेळली गेली. या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सुरुवातीपासूनच भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला चॅम्पियन करायचेच अशी खूणगाठ कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती. विश्व कसोटी चॅम्पियन स्पर्धेत भारतीय संघाला अंतिम फेरीत पोहाचवण्यास आलेले आल्यास अपयश आणि ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेतील पराभव विसरून त्यांनी नव्याने सुरुवात केली. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार रोहित शर्माच्या मनात होता. त्याने निवड समितीकडून त्याला हवे ते खेळाडू घेतले. दुबईतील खेळपट्टी फिरकीला अनुकूल असल्याने त्याने पाच फिरकी गोलंदाजांना संघात घेतले त्यातील रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या चार फिरकी गोलंदाजांना त्याने अंतिम अकरा मध्ये खेळवले आणि चारही फिरकी गोलंदाजांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत अप्रतिम कामगिरी केली. या चौघांना जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी , हार्दिक पांड्या आणि हर्षित राणा यांनी सुरेख साथ दिली. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला. अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती चारही फिरकी गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले. त्यांना मोहम्मद शमी आणि हार्दिक पांड्या ने सुरेख साथ दिल्याने भारताने न्युझीलंड संघाला अवघ्या २५१ धावात रोखले. न्युझीलंड संघाने डावाची सुरुवात तर धमाकेदार केली पण रचीन रवींद्र आणि केन विल्यम्सन हे त्यांचे भरावशाचे फलंदाज बाद झाल्यावर भारताच्या फिरकी गोलंदाजांनी फास आवळला आणि न्यूझीलंडच्या फलंदाजांना वेसण घातली त्याचा परिणाम असा झाला की त्रिशतकी मजल मारणारा न्युझीलंडचा संघ २५१ धावाच करू शकला. न्युझीलंड संघाला २५१ धावांवर रोखून भारताने अर्धी लढाई जिंकली. केवळ गोलंदाजांनीच नव्हे तर फलंदाजांनीही छान कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने ७४ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने आणि शुभमन गीलने शतकी सलामी देऊन विजयाचा पाया रचला. रोहित शर्मा हाच अंतिम सामन्याचा मानकरी ठरला. विराट कोहली स्वस्तात बाद झाला तरी श्रेयस अय्यर, अक्षर पटेल आणि हार्दिक पांड्या यांनी भारताला विजयी केले. अंतिम सामन्यातच नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारताच्या गोलंदाज आणि फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली . या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विजेतेपद मिळवले. रोहित शर्माने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला. भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद आहे. २००२ साली भारताने श्रीलंके सोबत संयुक्त विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार सौरभ गांगुली हा होता . त्यानंतर २०१३ साली महेंद्रसिंग धोनी कर्णधार असताना भारताने इंग्लंडला हरवून दुसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती त्यानंतर बारा वर्षानंतर भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून भारताने आम्हीच चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली हुकूमत पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग तीन स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला दोनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून मात्र त्यानंतर मागील वर्षी टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतेपद मिळवले होते आणि आता चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवणाऱ्या चॅम्पियन्स भारतीय संघाचे हार्दिक हार्दिक अभिनंदन! श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५

# महिला दिन नव्हे महिला दीन!

८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो, केला गेला. भारतातही या दिवसाची विशेष क्रेझ आहे. आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या स्त्रियांचा महिलादिनी विविध कार्यक्रमांतून, वृत्तवाहिन्यांतून, वृत्तपत्रांतून गौरव केला जातो. हे सारे पाहिल्यानंतर प्रश्न पडतो की, स्त्री ही केवळ एक दिवस गौरवण्याची बाब आहे का? प्राचीन हिंदू संस्कृतीचा अभ्यास केल्यास असे दिसून येईल की, येथे स्त्रीला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला शक्तीरुप मानले आहे. कोणतेही कार्य असो वा संकल्प त्यासाठी शक्ती अनिवार्य आहे. शक्तीविना कोणताही जीव अथवा वस्तू निर्जीव स्वरूप असते. शक्तीचा सन्मान करणारी देशात शक्तीपीठे आहेत. त्यातील साडेतीन शक्तीपीठे महाराष्ट्रात आहेत. सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दुष्टांच्या संहारार्थ शक्तीने वेळोवेळी आपले मारक रुप प्रकट करून आसुरी शक्तीचा विनाश केल्याचे धार्मिक कथांतून, भाविकांतून दिसून येते. ज्या दुष्ट शक्तीपुढे देवताही हतबल झाल्या त्याचा नाश देवींनी आपल्या अगाध सामर्थ्याने केला. रामायण घडले ते सीताहरणामुळे, महाभारत घडले ते द्रौपदीच्या अपमानामुळे. स्त्रीचा सन्मान करण्याची आणि तिच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण भारतीय संस्कृती आपल्याला देते. वीरमाता जीजाऊंनी शिवाजी महाराजांना बालपणीच शौर्याचे, अन्यायाविरुद्ध लढण्याचे बाळकडू पाजले नसते तर कदाचित या देशाला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय लाभले नसते. इतका गौरवशाली इतिहास देशाला लाभूनसुद्धा आज देशात स्त्रियांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. गत काही वर्षात स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग, अपहरण, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये आजही दिवसागणिक वाढ होत चालली आहे. आज एकटी स्त्री स्वतंत्रपणे घराबाहेर पडली तर ती सुरक्षित घरी परतेल की नाही याची खात्री कुणीच देऊ शकत नाही. एकेकाळी माता-भगिनीच्या रुपात असलेली महिला आज उपभोग्य वस्तू म्हणून पाहिली जात आहे. यातून विदेशी पर्यटक महिलाही सुटलेल्या नाहीत. दोन दिवसांपूर्वीच कर्नाटकातील हम्पी या पर्यटन स्थळावर एका इस्रायली महिला पर्यटकासह घरगुती निवासाची चालक असलेल्या स्थानिक महिलेवर तिघांनी बलात्कार केला. त्यांच्या बरोबर असणाऱ्या तीन पुरुष पर्यटकांना मारहाण करून त्यांना कालव्यात ढकलण्यात आले त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. या घटनेवरून आपल्या समाजाची उत्क्रांती होत आहे की अधोगती? असा प्रश्न पडतो. स्त्री-पुरुष हा समाजउन्नतीचा पाया काही गुंडांमुळे मुलींवरील हिंसक बलात्कारी घटनेने ढासळत असेल तर ती वेळ दूर नाही की ज्यामुळे मुली जन्माला घालणे मुळातच पापकर्म मानले जाईल. महिला दिनानिमित्त जागोजागी महिलांचे सत्कार व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी सरकारने महिलांच्या सुरक्षा व्यवस्थेकडे कठोर नजरेने पाहिले पाहिजे अन्यथा वर्षातून एकदा साजरा केला जाणारा ‘महिला दिन’ उर्वरित ३६४ दिवशी ‘महिला दीन’ म्हणून साजरा करावा लागेल. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोशल मीडिया खात्याची धुरा महिलांच्या हाती देण्यात आली होती. यात क्रीडा, विज्ञान, उद्योग, सामाजिक कार्य यासह विविध क्षेत्रांतील नामवंत महिलांचा समावेश होता. पंतप्रधानांच्या सुरक्षेची जबाबदारी महिलांच्या हाती देण्यात आली होती. नवसारी जिल्ह्यातील बोरसी गावात आयोजित लखपती दीदी कार्यक्रमात सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी आयपीएस अधिकाऱ्यांपासून पोलिस शिपायांपर्यंत सर्व सुरक्षा कर्मचारी महिला होत्या. यात २१०० हून अधिक कॉन्स्टेबल, १८७ पोलिस उपनिरीक्षक, ६१ पोलिस निरीक्षक, १६ पोलिस उपाधीक्षक, ५ पोलिस अधीक्षक, १ पोलिस महानिरीक्षक आणि एका अतिरिक्त पोलिस महानिरीक्षकाचा समावेश होता. महिलांच्या सुरक्षेला आपल्या सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले असून महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी कठोर कायदे करण्यात आले आहेत. बलात्कारासारख्या गुन्ह्यांसाठी फाशीच्या शिक्षेची तरतूदही करण्यात आली आहे, असे पंतप्रधानांनी म्हटले आहे. आज असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यात महिलांचा सहभाग नाही. सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रांत महिला आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवताना दिसत आहेत. पूर्वी चूल आणि मूल ही महिलांची ओळख होती ती आता पुसली गेली आहे. असे असले तर आज महिलांविषयक गुन्ह्यांचा आलेख पाहता तो नेहमीच चढत राहिला आहे. दिवसागणिक समाजाचे होत चाललेले नैतिक अध:पतन ही चिंतेची बाब बनली आहे. त्यावर वेळीच उपाययोजना करावी लागेल नाही तर महिलांना समाजात वावरणेही कठीण होऊन जाईल. त्यासाठी सर्वप्रथम अश्लील संकेतस्थळांच्या प्रसारणावर पूर्णतः बंदी घालावी लागेल. मालिका, चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील आणि कामुक दृष्ये दाखवण्यावर प्रतिबंध घालावा लागेल. बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपींना अश्लील मालिकांतून, दृष्यातून प्रेरणा मिळत असल्याचे एका निरीक्षणाद्वारे आढळून आले आहे. शाळा, महाविद्यालयांतून नैतिक मूल्यांचे शिक्षण अनिवार्य करावे लागेल. रणरागिणी झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, पुणश्लोक अहिल्याबाई होळकर यांसारख्या शूर आणि कर्तृत्ववान योध्द्यांची चरित्रे शिकवावी लागतील. मुलींना शाळा-महाविद्यालयांतून स्व-संरक्षणार्थ ज्युडो-कराटे, लाठी-काठीचे प्रशिक्षण अनिवार्य करावे लागेल. रेल्वे सुरक्षा दलामध्ये (आरपीएफ) कार्यरत महिला कर्मचा यांना स्वसंरक्षणार्थ मिर्ची-स्प्रे देण्यात येणार आहे म्हणे. महिलांना आपत्कालिन परिस्थितीत या स्प्रेचा वापर करता येऊ शकेल. महिलांनीही आपल्या मर्यादा पाळणे गरजेचे आहे. महिला म्हणजे आदिशक्ती, महिला म्हणजे ऊर्जा, महिला म्हणजे निर्मिती, महिला म्हणजे भविष्याची वाटचाल. तेव्हा भविष्यात देशात महिलाप्रधान संस्कृती अस्तित्वात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शेतकरी व ग्राहकांनी जिल्हा कृषि व धान्य महोत्सवात सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : महाराष्ट्र कृषी विभाग व रोटरी क्लब, नांदेड यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२५ दिनांक १७ ते १८ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित केला आहे. हा कृषी महोत्सव कृषि उत्पन्न बाजार समिती, नवा मोंढा, नांदेड येथे सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यत आयोजित केला आहे. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी या कृषी व धान्य महोत्सवास भेट देवून शेतमाल खरेदी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.या कृषी महोत्सवात परिसंवाद व चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री व कृषि प्रदर्शन, कृषि विज्ञान केंद्र, कृषी विद्यापिठाचे स्टॉल, विविध कृषी निगडित तंत्रज्ञानाचे प्रदर्शन व कृषी संलग्न शासकीय विभागाचे ५० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिला गटांचा सक्रिय सहभाग या महोत्सवात राहणार आहे.



या महोत्सवांच्या ठिकाणी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल गहु, ज्वारी, तांदुळ, तुर, मुग, उडीद, चनादाळ, हळद, मिरची, मसाले विविध प्रकारचे सेंद्रीय उत्पादने गुळ, हळद पावडर, सेंद्रीय डाळी तसेच नाविण्यपूर्ण उत्पादने जसे. मध, गुळाचा पाक व महिला बचतगटांची उत्पादने चटणी, लोणचे, पापड, कुरडई इत्यादी. तसेच टरबूज, खरबूज आदी फळे व भाजीपाला थेट विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहे. तसेच जात्यावरील सेंद्रीय डाळ, गोदाकाठची ज्वारी, सेंद्रीय हिरव्या भाज्या, फळभाज्या व फूलभाज्या व रानफळे विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत. तसेच शेतकऱ्यांनी विविध उत्पादित केलेले लाकडी घाण्याचे करडई, भुईमुग, जवस, तीळाचे तेल, बांबुपासून तयार करण्यात आलेले वस्तु केळीचे वेफर्स यांचे प्रदर्शन व विक्री होणार आहे. डिंक, बिब्याची गोडंबी आदी कच्चा माल उपलब्ध राहणार आहे.या महोत्सवामध्ये शहरातील व जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी भेटी द्याव्यात याचे नियोजन करण्यात येणार आहे. हा महोत्सव नांदेड शहरवासियांना मेजवानी असून सर्वानी यास भेट देवून शेतमाल खरेदी करावा व शेतकऱ्यांना प्रोत्साहन देवून त्यांचा आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक आत्माचे दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# लाभार्थ्यांना रेशन कार्ड ई-केवायसी करणे अनिवार्य

## शेतकऱ्यांनी प्राधान्याने ॲग्रीस्टॅक नोंदणी करण्याचे आवाहन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटूंब योजनेअंतर्गत शासकीय अनुदानित अन्न धान्याचा लाभ सुरु ठेवण्यासाठी कुटूंबातील रेशनकार्डमध्ये नोंदणी केलेल्या सर्व सदस्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे बंधनकारक आहे. तरी सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपल्या गावातील रास्तभाव दुकानदारांशी संपर्क करुन तात्काळ ई-केवायसी पूर्ण करुन घ्यावी,असे आवाहन तहसिलदार संजय वारकड यांनी केले आहे.

ई-केवायसी करण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांनी रास्तभाव दुकानात समक्ष उपस्थित राहून ई-पॉश मशिनवर बायोमॅट्रीक ऑथेंटिकेशन पूर्ण करावे, किंवा राज्य सरकारने एनआयसीच्या सहकार्याने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी मेरा ई केवायसी अप मोबाईलमध्ये सुरु केले आहे. यामुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष रास्त भाव दुकानावर न जाता घरबसल्या मोबाईलद्वारे ई-केवायसी पूर्ण करता येईल.ई-केवायसी पूर्ण न केल्याने अन्नधान्याचा लाभ बंद झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभार्थ्यांची राहील यांची नोंद घ्यावी,असे आवाहन अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्यावतीने केले आहे.

**ई–केवायसी साठी आवश्यक कागदपत्रे**कुटूंबातील सर्व लाभार्थ्यांचे मुळ आधार कार्ड, झेरॉक्स प्रती, रेशनकार्ड इ.एपीएल शेतकरी डीबीटी-राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी २०२३ पासून अन्नधान्य ऐवजी प्रतिमहा प्रति लाभार्थी १५० व १७० इतक्या रोख रकमेची थेट हस्तांतरणाची डीबीटी द्वारे योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने एपीएल शेतकरी लाभार्थ्यांनी रास्तभाव दुकानदार यांचेकडे सादर करावयाचे कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत. सर्व लाभार्थ्यांचे आधार कार्ड झेरॉक्स प्रत, राशनकार्ड झेरॉक्स प्रत, महिलांच्या नावाची पासबुक झेरॉक्स प्रत, सातबारा झेरॉक्स प्रत इ.

**ॲग्रीस्टॅक–**

केंद्र व राज्य सरकारने शेतीच्या लाभार्थ्यांस प्रत्येक शेतकऱ्यांना आवश्यक कृषी क्षेत्रात डिजीटल सेवाचा वापर करुन शेतकऱ्यांना जलदगतीने सेवा देण्यासाठी ॲग्रीस्टॅक म्हणजे शेतकरी ओोळखपत्र क्रमांक देण्याची प्रक्रीया सुरु आहे. पीएम किसान, सन्मान योजना, नैसर्गिक आपत्ती, मृदा परीक्षण, खत सक्ती आधुनिक शेतीसाठी मदत हवामान अंदाज, अवजारे आणि सिंचन योजना, शेततळे, ठिंबक सिंचन इत्यादी फायदे ॲग्रीस्टॅक कार्डमुळे शेतकऱ्यांना होणार आहे. यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या गावामधील सीएससी, सेतु धारक यांच्याकडे जाऊन अथवा कॅम्पमध्ये ॲग्रीस्टॅक मध्ये नाव नोंदणी करुन घ्यावी.

**आयुष्यमान भारत**

आयुष्यमान भारत कार्ड काढण्यासाठी लागणारी कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत. आधार कार्ड झेरॉक्स, रेशन कार्ड झेरॉक्स प्रत, मोबाईल इ.नागरिकांनी सीएसी, सेतु सुविधा धारक यांना संपर्क करावा, सध्या गावो-गाव कॅम्प चालू आहेत. नागरिकांनी या कॅम्पच्या ठिकाणी उपस्थित राहून रेशनकार्ड ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक व आयुष्यमान कार्ड काढून घ्यावेत, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# मयुध्द पेटले आहे या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शासनाचे अनुदान.

## कवी बाळासाहेब नागरगोजे यांच्या काव्यसंग्रहाची राज्यस्तरावर दखल.

पाटोदा: प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ- मुंबई (महाराष्ट्र शासन ) यांच्या नवलेखक अनुदान योजनेंतर्गत बाळासाहेब नागरगोजे यांनी लिहिलेल्या मयुध्द पेटले आहे म या काव्यसंग्रहाची राज्यस्तरावरील साहित्यविषयक तज्ज्ञ समितीकडून निवड झाली आहे.

बाळासाहेब नागरगोजे यांनी विविध वर्तमानपत्रांतून महाविद्यालयीन जीवनापासूनच सातत्याने लेखन केले आहे.कविता,लेख,कथा,नाटके इ. विषयांना त्यांनी स्पर्श केला आहे.

मराठी,हिंदी व इंग्रजी भाषांसह देशांतर्गत व जागतिक स्तराविविध भाषांमधील अनुवादित साहित्य हा त्यांच्या आवडीचा प्रांत आहे.मयुद्ध पेटले आहे हे भगतसिंहांचे शब्द आहेत. शहीद भगतसिंह व त्यांच्या सहकाऱ्यांचे अतुलनीय बलिदान व त्यांची प्रखर व प्रेरणादायी विचारधारा ही काव्यसंग्रहाची प्रमुख प्रेरणा आहे.

सदरील काव्यसंग्रहाची प्रस्तावना ज्येष्ठ साहित्यिक तसेच एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. अनंत कराड सर यांनी लिहिलेली आहे. तर काव्यसंग्रहाची पाठराखण (ब्लर्ब) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवी व लेखक डॉ.वीरा राठोड सर यांनी लिहिली आहे.

राज्य -देश व जागतिक पातळीवरील समकालीन घटनांबरोबरच मानवी दुःख,ऊसतोड कामगार,बालमजूरी,स्त्री भ्रुणहत्या,आदिवासी समाजाची दुरवस्था,सामाजिक व आर्थिक विषमता, जातीय व धार्मिक प्रश्न तसेच क्रांतिकारकांचे राष्ट्रउभारणीतील योगदान अशा बहुविध विषयांना नागरगोजे यांनी त्यांच्या कवितांच्या माध्यमातून व्यापक स्पर्श केला आहे. जाने.२०२५ मध्ये हा काव्यसंग्रह महाराष्ट्रभर प्रकाशित झाला असून आरेप वर सुध्दा तो उपलब्ध आहे.महाराष्ट्रात मयुध्द पेटले आहे म ची वाचकांकडून मागणी सातत्याने वाढत आहे.

बीड जिल्ह्यातील कवीची महाराष्ट्र शासनाच्या अनुदानासाठी निवड झाल्यामुळे सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### श्री जगद्गुरु तुकोबाराय ३७५ वा वैकुंठ गमन सोहळा - मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



बिडकीन - श्री जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी ३७५ वा वैकुंठ गमन सोहळा आणि राज्यस्तरीय अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आमदार विलास संदीपान भुमरे प्रतिष्ठान व डॉ. शिंदे धन्वंतरी मेडिकल फाउंडेशन यांच्या वतीने आठ दिवसांचे मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.शिबिराच्या पहिल्या दिवशी या उपक्रमाचे उद्घाटन ह. भ. प. एकनाथ महाराज जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बिडकीन ग्रामपंचायतीचे सरपंच अशोक धर्मे, युवा सेना जिल्हा प्रमुख काकासाहेब पाटील टेके, शिवसेना तालुकाप्रमुख मनोज पेरे, ग्रामपंचायत सदस्य मधुकर सोकटकर, किरण गुजर, बबन ठाणगे तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसादपहिल्याच दिवशी एकूण २२८ रुग्णांनी मोफत आरोग्य तपासणी करून घेतली. यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग आणि इतर आजारांच्या तपासण्या करण्यात आल्या तसेच आवश्यक असलेल्या रुग्णांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले.

या शिबिरात डॉ. दिपक गायकवाड, डॉ. त्रिंबक पाडळकर, डॉ. संतोष शेळके (अल्पाईन हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर), डॉ. असलम शेख आणि त्यांच्या नर्सिंग टीमने सेवा दिली. भाग्यश्री गवंदे, दीपाली निकाळजे, हेमंत जाधव आदी वैद्यकीय कर्मचारी देखील कार्यरत होते.पोलीस बंदोबस्त आणि नियोजन शिबिराच्या दरम्यान सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बिडकीन पोलीस स्टेशनच्या वतीने रेणुका बोंबले, शीतल जाधव, काजल चव्हाण, सुरेखा राठोड यांनी विशेष देखरेख ठेवली.

## १६ मार्च ला सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.....

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात येणार असल्याचे पत्रकार भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम यांनी कळविले आहे.म राठे साम्राज्य उत्तरेत पसरुन अटकेपार झेंडा लावून दिल्ली तक्ता वर स्वामीत्व गाजवणारा भारतीय इतिहासात मुत्सद्दी, शूर, लढवय्या, शौर्य वान सुभेदार मल्हारराव होळकर यांना महत्वाचे स्थान आहे, सुभेदार मल्हारराव होळकर यांचा जन्म धनगर समाजात क्षत्रिय हाटकर कुटुंबात झाला.पुणे सातारा सिमेवरील निरा नदीच्या किनारी असलेल्या होळ मुरुम



या गावी १६ मार्च १६९३ मध्ये सुभेदार मल्हारराव होळकर यांचा जन्म झाला.त्यांच्या वडीलांचे नाव खंडोजी असे होते, त्यांच्या मुलांचे नाव खंडेराव होते,तर सून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होय, सुभेदार म ल्हारराव होळकर यांच्या चार पत्नी होत्या,गौतम ाबाई ,द्वारका बाई,बनाबाई,हरकूबाई अशी त्यांची नावे होती, मल्हारराव होळकर यांना सुभेदार ही पदवी दिली होती, मल्हारराव होळकर यांचा मृत्यू २० में १७६६ मध्ये आलमपूर तालुका लहार, जिल्हा भिंड मध्यप्रदेश येथे झाला.अशा या महान शूर लढवय्या त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम

## गरजू लोकांना कीचनं किट वाटप व मार्गदर्शन शिबीर



बीड शहरातील ताज फंकशन हाल येथे आज दिनांक १० मार्च सोमवारी गरजू लोकांना किचन किट वाटप व विविध योजनाचे मार्गदर्शन शिबीर मा. शेख निजाम यांचे अध्यक्षते खाली वा एम आय एम चे जिल्हा अध्यक्ष शेख शफ्कि भाऊ,समाज सेवक मुसा खान,मौलाना आझाद मंडळ चे जिल्हा व्यवस्थापक इमरान कादरी सर, नगरसेवक सादेख भाई, सलाम सेट, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजक श्री राजू भाई आणि जुबेर खान होते. या कर्यक्रमात ५०० कामगार लोकांना किचन सेट वाटप करण्यात आले. तसेच संजय गांधी व श्रवान बाळ योजना चे २०० प्रस्ताव तयार करण्यात आले. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत येणाऱ्या योजना ची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात शेख निजाम भाई यांनी लाभार्थीयांना मार्गदर्शन केले.तसेच शफिक भाऊ आणि मुसा खान साहब यांनी राजू भाई व जुबेर खान चे सामाजिक कार्याचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिली.

## १० वर्षीय अरफात मलीक चव्हाण ने ठेवला आयुष्यातील पहिला रोजा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : इस्लाम धर्मात पवित्र रमजान या महिन्याला अनन्य महत्व प्राप्त आहे.या महिन्यात सर्वच मुस्लिम बांधव यांच्यावर वयाच्या दहाव्या वर्षा पासून रोजा (उपवास) फर्ज (सक्तीचे) असतात. लहानापासून मोठ्यापर्यत या महिन्यांमध्ये ३० दिवस रोजा धरत असतात. पालकांचे पाहून लहान मुलांनाही रोजा धरण्याची लालसा निर्माण होते. त्यामुळे लहान



चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा (उपवास) धरतात.अशाच प्रकारे किनवट येथील मलीक चव्हाण यांचा १० वर्षाचा मुलगा अरफात चव्हाण यांनी आपल्या जीवनातील पहिला रोजा सोमवारी १०- मार्च रोजी पूर्ण केला.मुस्लिम समाजात पवित्र असणा-या या महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर पाणी न पिता उपवास ठेवला जातो.यावर्षी रोजा (उपवास) सकाळी ५ :१० वाजता सुरू होत असून संध्याकाळी ६ :२८ ला रोजा सोडण्याची वेळ आहे.१३ तासा पेक्षा जास्त वेळचा उपवास असल्याने या उष्णतेचा मोठ्या माणसांनादेखील खूप त्रस होतो.त्यात या चिमुकल्याने पहिला रौजा ठैवून आपल्या आयुष्याची सुरुवात एक चांगल्या प्रकारे व्हावी या हेतूने उपवास ठैवला.त्यामुळे अरफात मलिक चव्हाण यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बीड । प्रतिनिधी जिल्हा शल्यचिकित्सक कमिटीने मुलाच्या दिव्यांग प्रमाणपत्रात ५० टक्के दिले असून, ऑनलाइनला २० टक्के नोंद झाली आहे. ती दुरुस्त करुन देण्यात यावी, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शरद सानप या दिव्यांग व्यक्तीने सोमवारी उपोषण केले. जिल्हा शल्यचिकित्सक कमिटीने मुलाला ५० टक्के असलेले ऑफलाइन दिव्यांग प्रमाणपत्रात दिले होते. मात्र ते ऑनलाइन करणाऱ्यांनी यात बदल करुन ५० ऐवजी २० टक्के केले. या संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. या प्रकरणी दोषीवर कारवाई करुन दिव्यांग प्रमाणपत्रात ऑनलाइनला ५० टक्के नोंद करण्यात यावी, अशी मागणी उपोषणकर्ते शरद सानप यांनी केली आहे.

# संत नगदनारायण महाराजांच्या सेवेचे नगद फळ मिळते -ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले गेवराईच्या भव्य कीर्तन महोत्सवाची उत्साहात सांगता

गेवराई : संत मंडळीचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. ही भूमी संतांची आहे. जो पर्यंत चंद्र, सूर्य आहेत तोपर्यंत या महाराष्ट्राच्या मातीत संतांचे विचार अजरामर राहणार आहेत. याच भूमीमध्ये थोर संत नगद नारायण महाराजांनी वास्तव्य केलेले असून संत परंपरेतील जुनी गादी म्हणून नगद नारायण महाराजांच्या गादीचा उल्लेख आहे. तर जो भक्त संत नगदनारायण म हाराजांची मनोभावे सेवा करतो त्याला नगद फळ मिळते. तसेच संत नगद नारायण महाराजांमुळे बीड जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी भक्तीचा ध्वज दिमाखात फडकत आहे. आणि त्यांच्या आशिर्वादाने अनेकांचे कोटकल्याण झालेले आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांनी व्यक्त केले.गेवराई येथील संत गजानन महाराज, मंदिर प्रांगणात स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण म हात्मा श्री नगदनारायण महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त वै.महादेव महाराज यांच्या कृपेने, महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते व ह.भ.प.संभाजी म हाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या भव्य कीर्तन महोत्सवाची मंगळवार दि.११ मार्च रोजी ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी पंचक्रोशीतील संत, महंत, टाळकरी, वारकरी, चोपदार , गायणाचार्य, मृदंगाचार्य, भजनी मंडळ, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बांधव तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पुढे बोलताना ह.भ.प. बोधले महाराज म्हणाले की, संताची पुण्यतिथी का साजरी करावी तर संतांनी लोककल्याणासाठी कोणती मूल्य घेऊन जगले. याची महती तुम्हा आम्हाला व्हावी यासाठी पुण्यतिथी साजरी केली जाते. ज्यांनी समाजातील उपेक्षित घटक आपल्या कार्याचा केंद्रबिंदू मानला ती माणसं चंद्र , सूर्य आहे तोपर्यंत लोकांच्या मनावर आधिराज्य करत असतात विविध अंगाने प्रतिकूलता निर्माण झाल्यानंतर आपली साधनेवरची ईश्वरनिष्ठा, गुरुनिष्ठा, धर्मनिष्ठा ही या साधुसंतांनी जपलेली आहे. समाजाचे कल्याण करण्यासाठी आपले जीवन चंदनाप्रमाणे कसे झिजवले हे साधू संतांच्या जीवन चरित्रातून आपल्याला धडे मि ळत असतात असेही शेवटी बोलताना त्यांनी सांगितले. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तर या भव्य कीर्तन महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीच्या पदाधिका-यांनी आठ दिवस मोठे परिश्रम घेतले आहेत.

# वारकरी संत माणुसकी जिवंत ठेवणारा धर्म शिकवतात- ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे

बीड (प्रतिनिधी) वारकरी संत माणुसकी जिवंत ठेवणारा धर्म शिकवतात त्यामुळे समाजाला एक वेळ देव नाही समजला तरी चालेल पण वारकरी संत समजले पाहिजेत आणि जेव्हा वारकरी संत समजतील तेव्हा देव आपोआपच समजेल असे प्रतिपादन ह. भ. प. समाजप्रबोधनकार संतोष म हाराज डोंगरे यांनी केले. संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकोबाराय सेवापीठ तळेगाव येथे संत तुकाराम महाराजांच्या त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज सोहळ्यानिमि त्ताने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील दुस-या दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते.

क्षण क्षणा हा ची करावा विचार ।।
तरावया पार भव सिंधु ।।
नाशिवंत देह जाणार सकळ
आयुष्य खातो काळ सावधान ।।
संत समागमी धरावी आवडी ।
करावी तातडी परमार्थाची ।।
तुका म्हणे इहलोकीच्या व्यवहारे ।
नका डोळे धुरे भरुनी राहो ।।

या जगद्गुरु तुकोबाराय यांच्या गाथेतील चार चरणांच्या अभंगावर निरूपण करताना महाराज पुढे म्हणाले की वारकरी संप्रदाय म्हणजे भेद आणि भीती नसलेलं वातावरण. सगळ्यांना प्रवेश कुठल्याही अटी नाही की शर्ती नाही.सर्वांना समान संधी आणि समान दर्जा दिला जातो. वारकरी संप्रदायामध्ये काल्पनिक देव देवता, भाकडकथा, कहाण्या यांना स्थान नाही. सत्य, वास्तववादी, मानवी जीवनात उपयोगी विचार वारकरी संतांनी दिला. मानवी जीवनामध्ये अशी एकही समस्या नाही की ज्या समस्येचे उत्तर वारकरी संत साहित्यात सापडत नाही संतांची साहित्य संपदा समजून घेतली पाहिजे. त्यांच्या शब्दांची भक्ती केली की संतांची भक्ती होते आणि संतांची भक्ती झाली की देवाची भक्ती होते. त्यामुळे संत साहित्यातून वारकरी संतांनी दिलेला विचार तळागाळातील जनमानसापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. वारकरी संत साहित्य म्हणजे समाजाचा तारक मंत्र आहे. त्यात समाजाच्या उद्धाराचा मार्ग सांगितलेला आहे. त्यामुळे वारकरी संतांच्या साहित्याला प्रम ाण मानून ते समजून घेऊन समाजाने वाटचाल केली तर समाजाचा उद्धार निश्चित होईल. मानवी जीवनातील संकटांना सामोरे कसे जावे ?, आपल्या जीवनातील प्रश्न कसे सोडवावेत ?, भक्ती कशी करावी ?, कोणत्या देवाची करावी ?, पुण्य म्हणजे काय ?, ते कसे प्राप्त करावे ?,पाप म्हणजे काय ?, त्यातून कसे मुक्त व्हावे ?, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे संत साहित्यात मिळतात त्यामुळे संत विचारांच्या सानिध्यात गेलेली माणसे दुःखाच्या व संकटाच्या काळातही आनंदी राहतात असे ते म्हणाले. यावेळी जगद्गुरु तुकोबाराय सेवापिठाचे संस्थापक अध्यक्ष ह भ प परशुराम महाराज मराडे, ह भ प दत्तात्रय महाराज बहिर, ह भ प श्रीकृष्ण महाराज उबाळे, ह भ प सुधाकर महाराज शिंदे, ह भ प घोलप महाराज, ह भ प गोरे महाराज, यांच्यासह गायक, वादक, टाळकरी, विणेकरी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांची उपस्थिती होती.

## अभिनंदन पठ्ठ्या रुई (पिंपळा) गावातील पहिला फौजी युवा सरपचाकडून भुमीपुत्राचा सन्मान!

वडवणी/ लोकपत्रकार भांगे रुई (पिंपळा) गावातील भूमिपुत्र, तसेच आपल्या स्वतः च्या जिद्दी व आवडीच्या जोरावर वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी मामश्रीमशिवराजम प्रभाकरमआंधळे यांची नुकतीच भारतीय लष्करामध्ये निवड झाल्याबद्दल त्याचा , आज उपस्थित ग्रामस्थांच्या व ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या हस्ते यथोचित सन्म ानपुर्वक अभिनंदन करुन सत्कार करण्यात आला.. व त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.रूई गावाचा पहिला फौजी.. श्री. शिवराज प्रभाकर आंधळे यांने आपल्या आवड व ईच्छाशक्ती नुसार गावातील पहिला फौजी होण्याचा मान मि ळवलेला आहे.. त्याची त्यासाठी असणारी कठीण मेहनत, कष्ट व तयारी मी स्वतः हा मागील २ वर्षापासून पाहत आलोय..



त्या मुळे त्यांचे देशसेवेसाठी असणारे प्रेम आमच्यासाठी व गावातील नवीन पिढीसाठी आदर्श व प्रेरणादायी आहे.तसेच त्याच्या या कठीण मेहनत व कष्टामध्ये त्याच्या वडिलांची पण सिहांचा वाटा आहे.. त्यांची त्यांच्या दोन्ही मुलासाठीची सतत असणारी धावपळ व त्यांना समाजाप्रती असणारे संस्कार.. आम्ही सर्वांनी पाहिलेले आहे.. त्यामुळे त्यांचा पण सर्व उपस्तिथच्या गावक-यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी रोहित पिंपळा गावचे विकास पुरुष गावचं विकासाच्या रुपाने कायापालट करणारे मयूर शेठ आंधळे , यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील पहिला फौजी मन मिळवणारा शिवराज याला पुढील शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्राम स्थ उपस्थित होते.

## शिवभूमी विद्यालय प्राथ विभाग निगडी येथील शाळेत म हिला दिनाचा सोहळा रंगला विविध स्पर्धा व कार्यक्रमांनी.

शिवभूमी विद्यालय प्राथ विभाग येथील शाळेत इयत्ता १ ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांनी महिला दिना निमित्त विविध आधुनिक यशस्वी महिलांची भुमिका साकारली होती कुणी पहिली महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील तर कुणी सुनिता विल्यम तर कुणी पी.टी उषा तर कुणी लता मंगेशकर अशा विविध वेशभुषा करून आल्या . त्यांच्या बरोबर माता पालकांनीही यात सहभाग घेतला होता प्रत्येक वर्गातून कुणी जिजाऊ तर कुणी पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी तर कुणी बहिणाबाई,अहिल्याबाई,येसूबाई , सावित्रीबाई,सिंधुताई अशा वेशात आल्या होत्या प्रत्येक माताने आपल्या भुमिकेतून विद्यार्थ्यांना जीवनाचे खरे ध्येय त्यासाठीचा लढा छोट्या छोटया गोष्टीतून सांगण्याचा प्रयत्न केला . या दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी यशस्वी महिलांचे फोटो घेऊन त्यांची ओळख,कार्य सांगितले महिलाविषयी गीत कविता सादर करण्यात आले



सोहळ्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेह-यावर ओसंडून वाहत होता. शाळेच्या सांस्कृतिक प्रमूख कोठेकर योगिता यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच म पणती जपून ठेवा अंधार फार झाला म हे गीत सहकारी शिक्षकांसवे सादर केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.पाटील अश्विनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच सर्व माता पालकांचा, महिला शिक्षकांचा यथोचित सन्मान केला शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,पालक माता पालक यावेळी उपस्थित होते. सर्वांनी विविध यशस्वी महिलांचे फोटो पाहून आनंद व्यक्त केला रांगोळ्या चित्रकलेने सजलेले वर्ग पाहिले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

# माध्यमिक शिक्षणाधिकारी हटाव प्रकरणात शिक्षण उप संचालकांनी मागितला अहवाल.

### शिक्षणाधिकारी हटाव आंदोलनाचा परिणाम !

जालना दि ११ (वार्ताहर ) दि २७फेब्रुवारी २०२५ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी जालना यांच्या दालनात झालेल्या प्रकरणाविषयी शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर प्रकाश मुकुंद यांनी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम तसेच त्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करण्यासाठी काल दि १० मार्च रोजी दुपारी ४ वा बैठक आयोजित केली होती या बैठकीत माध्यमिक शिक्षणाधिकारी जालना मंगला राजू गायकवाड धुपे यांच्या भ्रष्ट कारभाराविषयी व कार्यालयीन कामाच्या दप्तर दिरंगाई बद्दल आणि पदाधिकाऱ्यांना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देऊन त्यांच्यावर खोटे गुन्हा दाखल करणे या विषयी आरोप पत्र ठेवण्यात आले होते येत्या दोन दिवसात त्यांच्याविरुद्ध सहाय्यक शिक्षण उपसंचालक डॉ सतीश सातव यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करण्यात येईल व कठोरातील कठोर कारवाई केल्या जाईल त्यासंबंधी अनुपालन अहवाल सादर करण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना ८ दिवसाची मुदत देण्यात आली आहे.* काय ठेवण्यात आले होते आरोप? १) संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देणे २) अर्वाच्य भाषा वापरून पदाधिकाऱ्यांच्या अंगावर धावून जाणे ३) दीर्घकाळ संचिका प्रलंबित ठेवणे ४) वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे ५) अर्थार्जनासाठी कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देणे यासोबतच संघाने केलेल्या मागण्यानुसार १)दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून द्यावेत २) वैयक्तिक मान्यतेमध्ये झालेली अनियमित दूर करावी ३) दीर्घ काळापासून प्रलंबित प्रकरणे निकाली काढावी. ४) सन २०२१ पासून च्या भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात याव्यात ५) सहाव्या व सातव्या वेतन आयोगाचा थकीत पाचवा हप्ता त्याच पद्धतीने (१ला,२ रा,३रा व ४था ) हे थकीत हप्ते कोणत्याही कारणास्तव प्रलंबित असतील तर ते ७ फेब्रुवारी २०२५च्या परिपत्रकानुसार काटेकोरपणे अंमबजावणी करून माहे मार्च २०२५च्या वेतनासोबत देण्यात यावा या १ ते ५ मुद्द्यानुसार अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा असे पत्रात नमूद केले आहे यावेळी संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, सदस्य प्रेम दास राठोड , डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ उमाकांत राठोड, बामुक्तो चे सरचिटणीस तथा अर्थशास्त्राचे प्रसिद्ध अभ्यासक डॉ मारुती तेगमपुरे , सचिव चंद्रकांत भाई , चव्हाण, ढमढेरे , कदम ,जालना जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवंते, उपाध्यक्ष जगन वाघमोडे, जेष्ठ पत्रकार तथा सेवानिवृत्त शिक्षक भगवान पालकर , अन्यायग्रस्त शिक्षिका मोहम्मद शिरीन बेगम शहा, प्रसिद्धी प्रमुख हकीम पटेल हे व इतर पदाधिकारी उपस्थित होते

# धनंजय मुंडेंच्या आई गावी का गेल्या होत्या ? अजय मुंडेंनी दिले स्पष्टीकरण

बीड। प्रतिनिधी महाराष्ट्र सरकारचे मंत्री आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी नुकतेच मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांपैकी एक वाल्मिक कराड याच्यावर सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा आरोप आहे. यानंतर मुंडेंवर राजीनामा देण्यासाठी दबाव वाढला होता. धनंजय मुंडेंवर आरोप केले जात आहेत. हे आरोप भाजप आ.सुरेश धसांकडून केले जात आहे. यावर आता धनंजय मुंडेंचे भाऊ अजय मुंडेंनी प्रतिक्रिया दिली आहे. आज (दि.११) रोजी अजय मुंडेंनी पत्रकार परिषद घेतली आहे. यात त्यांनी आरोपांचे खंडण केले आहे. तसेच हे आरोप बिनबुडाचे असल्याचे त्यांनी सांगितले आहे. यावेळी बोलताना अजय मुंडे म्हणाले की, राज्यात सनसनाटी निर्माण करण्यासाठी हे आरोप लावले गेले आहेत. सुरेश धस यांचे आरोप बिनबुडाचे आहेत. आमच्या कुटुंबाची बदनामी करण्याचे काम सुरू झाले आहे, असं ते यावेळी म्हणाले. तसेच धनंजय मुंडेंच्या आई गावी का गेल्या होत्या, याचा खुलासाही त्यांनी केला आहे.ते म्हणाले की, कारण नसताना धनंजय मुंडेंना बदनाम केले जात आहे. आम्ही सर्व मुंडे कुटुंबीय धनंजय मुंडेंच्या पाठीशी खंबीर उभे आहोत. धनंजय मुंडेंच्या घराचे काम सुरू होते. यामुळे त्यांच्या आई गावातील घरी राहण्यास गेल्या होत्या, असा खुलासाही अजय मुंडेंनी केला आहे. संतोष देशमुखांना न्याय मिळावा म्हणून कार्यकर्ते काही बोलत नाही. देशमुखांना न्याय द्यायचा आहे म्हणून आम्ही गप्प आहोत, असंही त्यांनी यावेळी सांगितले.



अजय मुंडे पुढे म्हणाले की, खोक्याचा आका कोण आहे? हे देखील आम्हाला माहिती आहे. खोक्याच्या प्रकरणात



सुरेश धस यांनाही सहआरोपी करा. आ.सुरेश धस हे किती धुतल्या तांदळासारखे आहेत हे ही आम्हाला माहिती आहे.

मस्साजोगची घटना ही अत्यंत दुर्दैवी आहे. पण या प्रकरणाती परळीची नाहक बदनामी केली जात आहे. याचे आम्हाला दुःख वाटते.माझ्या कुटुंबावर आरोप लावले गेले आहेत. यामुळे आज मी माध्यमांसमोर बोलण्यासाठी आलो आहे. आम्हालाही बोलता येतं पण आम्हाला सनसनाटी निर्माण करायची नाही आहे. खोक्याला धस साधा कार्यकर्ता म्हणतात. पण साधा कार्यकर्ता २०० हरणं कापून खातो. यामुळे धसांनाही आरोपी करा, अशी मागणी अजय मुंडे यांनी केली आहे.

## श्रीसर्वतीर्थ सेवा महानुभव आश्रम बक्करपुर द्वारा स्थानवंदन पदयात्रेचे लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत




लिंबागणेशः- ( दि.११) म हानुभव पंथाचे संस्थापक,थोर समाजसुधारक तत्वज्ञ चक्रधर स्वामी यांच्या आदरणीय परमपूज्य महंत कानळसकर बाबा महानुभव यांच्या म ार्गदर्शनाखाली दि.६ मार्च रोजी आष्टी तालुक्यातील वाकी येथुन शुभारंभ झालेली पदयात्रा शिराळा, पारगाव जोगेश्वरी आष्टी,मातकुळी,वनदेव,राम दरा,सौताडा,साकत, पाटोदा, वैद्यकिन्ही,लिंबागणेश,पोहिचा देव,पाली आणि बीड येथे समाप्ती होणार आहे. पदयात्रेचे हे विसावे वर्ष आहे. श्रीसर्वतीर्थ सेवा महानुभव आश्रम बक्करपुर स्थानवंदना पदयात्रेचे आज दि.११ मंगळवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश नगरीत घरासमोर रांगोळी, औक्षण करत आतीशबाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले. लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात चक्रधर स्वामी मंदिरात महानुभव भक्तांच्या वतीने बाबांचे शाल श्रीफळ आणि पुष्पहार करून स्वागत करण्यात आले.श्रीकृष्ण मंदिरात विडा,आवसर, देवाला आरती करून महंत कानळसकर यांचे सुश्राव्य प्रवचन झाले.चक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पावन स्थानांची महती सविस्तर विशद करून सांगितली.दुपारीदेवाला उपहार करून भोजन करण्यात आले.भोजनाची व्यवस्था श्रीकृष्ण मंदिर देवस्थान व गावातील महानुभव भक्तांच्या वतीने करण्यात आली होती. यावेळी बाळुकाका पाटोदकर, राजाभाऊ गिरे, अर्जुन गिरे,अनंतकाका मुळे, भालचंद्र गिरे,गोवर्धन गिरे, सुदाम मुळे, तुळशीराम वनवे,किसन आबदार , ज्योती पाटोदकर आशाबाई गिरे,सिंधुबाई गिरे, ज्योती गिरे,उषाबाई मुळे व भाविक उपस्थित होते. दुपारचे भोजण आणि विश्रांती नंतर पदयात्रा पोहिचा देव कडे म ार्गस्थ झाली.

## कै. गणपतराव गुट्टे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि श्री वैधनाथ आय टी आय आरोग्य शिबीर संपन्न...

परळी/प्रतिनिधी
याबाबत सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील हाळम येथे संस्थेचे अध्यक्ष मा. माधव मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली,कै. गणपतराव गुट्टे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि श्री वैधनाथ आय टी आय मध्ये आरोग्य शिबीर संपन्न झाला..या वेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली .या वेळी डॉ. म्हणून धर्मापुरी आरोग्य विभाग चे तज्ञ म्हणून डॉ.घोबाळे सर व आरोग्य सेवक म्हणून बालाजी शिंदे सर यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील व आय टी आय. कॉलेज च्या विद्यार्थ्यांची तपासणी झाली होती. या मध्ये विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती देत औषध उपचार करण्यात आले होते. शिबिरप्रसंगी शिबिर अध्यक्ष म्हणून माधव मुंडे सर,माणिकराव दहिफळे,सुधाकर गित्ते, विष्णू दहिफळे ,सर्वश्री ज्ञानेश्वरी फड मॅडम,आय टी आय चे प्रिंसीपल सोमेश मुंडे सर ,के.जी.जी स्कुल चे प्रिंसीपल नवल वर्मा सर ,गोविंद दहिफळे सर या वेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम सुत्रसंचलन संध्या चव्हाण मॅडम आणि केले व आलेल्या पाहुण्यांचे आभार सर्व स्टाफ ने मानत शिबीर संपन्न केला.शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ज्ञानेश्वरी फड मॅडम सोमेश मुंडे सर,नवलकुमार वर्मा सर,,संध्या चव्हाण मॅडम, प्रदीप पिंपळे सर,गोविंद दहिफळे सर,सुजित हाके सर ,करुणा वाघमारे मॅडम,राहुल पंडित सर, आरती फड मॅडम,वैष्णवी दहिफळे मॅडम,सुमन सरवदे मॅडम,स्वप्नालीआव्हाड मॅडम,श्रीकृष्ण मुंडे सर, नागनाथ कातकडे सर,अमोल कातकडे सर, प्रतीक्षा मेंगले मॅडम,अक्षता मुंडे मॅडम, वसंत होळंबे , हरिचंद्र मुंडे. शोभा मुंडे,सोनाली मुसळे,सोमेश्वर गुट्टे,,लहू गुट्टे ,बाबुराव केंद्रे..

# मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढवायची असेल तर अमरसिंह पंडीतांना पक्षाने ताकद द्यावी

## अभ्यासु नेत्रुत्व अमरसिंह पंडीत साहेबांना विधान परिषदेवर घ्या : जयदिप औटी

उमापूर / प्रतिनिधी मराठवाड्यात अभ्यासू नेतृत्व म्हणून माजी आ. अमरसिंह पंडित यांच्याकडे पाहिले जाते सदैव तळागाळातील जनते सोबत जोडली गेलेली नाळ ही त्यांनी कधीच तुटू दिली नाही. लोकांच्या सुख दुःखात सदैव सहभागी राहिलेले आहेत. अशा नेतृत्वाला विधानपरिषदेवर संधी द्यावी व बीड जिल्ह्यासह मराटवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस ची ताकद वाढवावी अशी मागणी गेवराई तालुका खरेदी विक्री संघाचे सभापती जयदिप औटी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

माजी आ.अमरसिंह पंडीत सत्तेत असताना लोकाभिमुख कार्य तसेच शारदा प्रतिष्ठानच्या वतीने सतत काम करत आलेले आहे. विवाह सोहळा, आदर्श शिक्षक पुरस्कार, कोवीड



काळामध्ये चालू केलेले कोवीड सेंटर, लोकप्रतिनिधी घरात बसलेले असताना ते गोरगरिबांच्या सेवेत होते, प्रश्न मतदारसंघातला असो किंवा सगळ्या बीड जिल्ह्यातला असो अडचण किंवा काम घेऊन त्यांच्या कडे गेला आणि



तो रिकाम्या हाताने परत आला नाही. प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये सहभाग घेतलेला आहे शेतक-याचे प्रश्न असो पाण्याचा आहे शेतक-याचे प्रश्न असो पाण्याचा प्रश्न असो किंवा आणखी कुठलेही प्रश्न असं प्रत्येक गोष्टींमध्ये



ते अग्रेसर असतात म्हणून अशी व्यक्ती विधानभवनामध्ये आवाज उठवण्यासाठी आवश्यक आहे. जनसामान्याच्या हितासाठी कायम जनतेत राहून नागरिकांचे प्रश्न सोडविणारे अभ्यासू नेतृत्व राष्ट्रवादीपक्षाचे नेते गेवराई मतदार संघाचे भाग्यविधाते अमरसिंह पंडीत भैय्यासाहेब यांना विधान मराठवाड्याच्या हितासाठी सभागृहात आवाज उठविणारे महाराष्ट्रातील नागरिकांचे लक्ष वेधून घेणारे अभ्यासू नेतृत्व गेवराई मतदार संघातील नागरिकांच्या अडीअडचणी तात्काळ सोडविण्यासाठी कायम तत्पर राहून काम करणारे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विश्वासू अमरसिंह पंडीत यांना राजेश विटेकर यांच्या रिक्त झालेल्या जागेवर विधान परिषदेत काम करण्यासाठी जनतेच्या सेवेसाठी अभ्यासू व्यक्तिमत्त्व अमरसिंह पंडित यांना संधी द्यावी असे गेवराई खरेदी विक्री संघाचे सभापती जयदीप औटी यांनी केली आहे

# पक्षांसह वृक्ष संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकारपक्षांसाठी झाडावर पाणवठे तर झाडांसाठी ठिबक सिंचन; कोळेश्वर विद्यालयाचा उपक्रम

गेवराई : प्रतिनिधी

तिव्र उन्हाळा सुरु झाल्यामुळे पाण्याची टंचाई जाणवत आहे, अशा परिस्थितीत शाळेच्या परिसरातील लहान वृक्षांचे संगोपन करून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी तसेच वृक्ष व पक्षी संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, हा उदात्त हेतू समोर ठेवून गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील कोळेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविला आहे. शाळेच्या परिसरातील झाडांसाठी ठिबक सिंचन करुन वृक्ष संगोपन केले जात आहे. तसेच पशुपक्षांसाठी याच झाडांवर पाणवठे बांधण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे भर उन्हाळ्यात पक्षांची तहान भागविली जात आहे, त्याचबरोबर वृक्ष देखील होत आहे.

उन्हाळ्यात पक्षी व वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी गेवराई तालुक्यातील कोळगांव येथील कोळेश्वर विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेवून विद्यालयाच्या परिसरातील मोठ्या



झाडांवर पाण्याच्या कुंड्या अडकवून उन्हाळ्यात पक्षांची तहाण भागविव्याचा उपक्रम राबविला जात आहे. पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था झाल्यामुळे पाणी पिव्यासाठी झाडांवर विविध प्रकारचे पक्षी दिसुन येत आहेत. तसेच पक्षी संवर्धनाबरोबरच नविन लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी टाकावू पाणी बॉटलच्या सहाय्याने झाडांना ठिबक सिंचन करून पाणी दिले जात आहे. झाडांच्या खोडालगत पाण्याने भरलेल्या बॉटल ठेवल्यामुळे त्यामधुन सतत पाणी टिपकत राहील अशी व्यवस्था केल्यामुळे झाडाच्या खोलवर ओलावा होत आहे. झाडांना पाणी व पक्षांसाठी बांधण्यात आलेल्या कुंड्यात पाणी टाकण्यासाठी येथील विद्यार्थी मेहनत घेताना दिसतात. यामुळे भर उन्हाळ्यात देखील झाडे टवटवित दिसु लागली आहेत. या अनोख्या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना या विद्यालयाचे कला शिक्षक किशोर निकम सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. तसेच या उपक्रमाचे विद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश बागलाने यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व ग्रामस्थांनी कौतूक केले आहे.

### झाडे लावा झाडे जगवा यासह पक्षी संवर्धनाची विद्यार्थ्यांमध्ये आवड

तहानलेल्या पक्षांसाठी शाळेच्या आवारात असलेल्या झाडावर पाण्याच्या कुंड्या बांधल्या आहेत. यामुळे विविध पक्षांचा शाळेच्या आवारात सतत किलबिलाट पहायला मिळतो. तसेच नवीन वृक्ष भर उन्हाळ्यात देखील संगोपन झाले पाहिजे यासाठी टाकाऊ बाटल्यापासून झाडांना सिंचणाप्रमाणे पाणी दिले जाते. या उपक्रमामुळे झाडे लावा, झाडे जगवा यासह पक्षी संवर्धनाची एकप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होत आहे.

किशोर निकम
कला शिक्षक, नुतन कोळेश्वर विद्यालय

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र सेवादलाच्या प्रदेश महिला सचिव संघटक प्रियाताई गायकवाड यांच्यावतीने महिला दिन उत्साहात संपन्न..!



बदलापूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) महिलांच्या अन्यायाविरुध्द आणि महिलांच्या सशक्तीकरणासाठी व सक्षमीकरणासाठी महिलांनी एकत्र येणे गरजेचे आहेत. समाजात वावरताना महिलांना येणारे प्रश्न आणि समस्या महिलांच्या संघटनानातूनच सोडवणे शक्य आहे.आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मी माझ्या बहिणींना आई आईना सांगू इच्छिते की स्त्री शक्ती ही अमूल्य आहे,आपण सदैव सकारात्मक दृष्टीकोन ठेवून महिलांचे प्रश्न सोडवले पाहीजे असे महाराष्ट्र सेवादलाच्या प्रदेश महिला सचिव सौ.प्रियाताई गायकवाड यांनी महिलांना मार्गदर्शन करताना संबोधित केले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सेवादलाच्या महाराष्ट्र प्रदेश महिला संघटक प्रियाताई गायकवाड यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह बदलापूर येथील रेल्वे आरपीएफ ऑफीस,महिला न्यूज चॅनल ॲंकर,सत्कर्म अनाथ आश्रम,बदलापूर पश्चिम पोलीस स्टेशन,शिवसेना उपशहर प्रमुख कार्यालय तसेच स्वतः बिझनेस करणा-या मुली अशा विविध क्षेत्रातील कार्यरत असलेल्या महिलांना भेट देऊन त्यांचा सत्कार व त्यांना महिला सशक्तीकरण कसे करावे या संदर्भात मार्गदर्शन करुन प्रोत्साहन दिले. तर या कार्यक्रमासाठी सुरेखा तळेकर, कल्पना मेरुगवार,सुकन्या संदेश गांगण,वंदना भगत या सेवा दलाच्या महिला कार्यकर्तींचे सहकार्य लाभले.

## मा.भारत गदगे यांना जीवन गौरव पुरस्कार.

पंढरपूरचे सुप्रसिद्ध चित्रकार लोकमान्य विद्यालयाचे मा.पर्यवेक्षक श्री.भारत गदगे सर यांना सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. डॉ. किर्लोस्कर सभागृहात हि.ने.वाचनालय येथे हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला होता. त्यांना प्राचार्य श्री.सुधीर देवरकोंडा,मा. गोपाळराव डांगे, मा.भंवर राठोड, डिझाइनचे व्यवस्थापख धर्मेश टंक, मुख्या.गोपीनाथ नवले,मा.सतीश सुभेदार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार रविवार दि.९ मार्च रोजी प्रदान करण्यात आला.

मा.भारत गदगे सर हे पंढरपूरचे उत्तम चित्रकार असून त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन नामांकित कला दालनांमध्ये कैक वेळा भरविले गेले आहे. श्री.विठ्ठल रुक्मिणीचे सुंदर अशा प्लॅस्टरच्या मूर्ती कैक ठिकाणी पहायला मिळतात. राष्ट्रपती व राजभवनात ही त्यांच्या चित्रांना स्थान मिळाले आहे. कैरव शास्त्रीय संगीत कार्यक्रम चालू असताना त्यांनी अनेक गायक वादकांची तिथेच चित्रे काढून त्यांना भेट दिली आहेत. चित्रकार म्हणून ते तर प्रसिद्ध तर आहेतच पण एक चांगले मित्र, शिक्षक,म्हणून ते आपल्या मित्र कंपनीमध्ये प्रसिद्ध आहेत. अशा योग्य शिक्षकाचा,चित्रकाराचा सन्मान झाल्यामुळे पुरस्कार देणार्या संस्थेचाच नावलौकिक वाढलेला आहे. असे वाटते.सरांना या जीवन गौरव पुरस्कार मिळाल्या बद्दल अभिनंदन.

## उद्योजिका, लेखिका रूपाली देशपांडे स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित

बीड (प्रतिनिधी) - दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्ताने राज्यस्तरीय मस्त्री रत्नफ पुरस्कार सोहळा २०२५, शनिवार दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. हॉटेल नीलकमल हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. यात बीड शहरातील प्रसिद्ध उद्योजिका तथा लेखिका रूपाली देशपांडे यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे आणि प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्ताने राज्यस्तरीय मस्त्री रत्नफ पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रात आपल्या कर्तबगारीने नावलौकिक मिळविलेल्या महिलांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यात शून्यातून विश्व निर्माण करणा-या विविध व्यवसाय करत आज रिच इव्हेंट्स आणि रिच टूर्स अँड ट्रॅव्हल्स च्या माध्यमातून नावलौकिक मिळविलेल्या उद्योजिका तसेच वृत्तपत्रातून अनेक सामाजिक समस्या



आणि प्रश्नांना आपल्या लेखणी द्वारे मांडणा-या लेखिका रूपाली जयंत देशपांडे यांना स्त्री रत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी होते. विशेष अतिथी तथा प्रमुख सत्कारमुर्ती म्हणून प्राजक्ता सुरेश धस होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, उपविभागीय जिल्हाधिकारी कविता जाधव, माजी आमदार अड. उषा दराडे, पोलीस उपाधीक्षक पुजा विठ्ठल पवार, उपविभागीय पोलीस अधीक्षक विश्वांभर गोल्डे, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर, एलसीबी चे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, तहसीलदार चंद्रकांत शेळके, प्रभारी गटशिक्षणाधिकारी समंदर खान पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

रूपाली देशपांडे यांच्या कार्यकर्तुत्वाची नोंद घेऊन त्यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने सविता देव, जयंत देशपांडे, राजेश राजूरकर, स्वाती राजूरकर, जयदीप परळकर, जयसिंग मामा चुंगडे, डॉ. प्रदिप कुमार उजेगर, हरीश मोटवाणी, गंगाबिशन करवा, संपादक दिलीपजी खिस्ती यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात ५४ गरजूंना कृत्रिम हात व पायाचे वितरण





माजलगाव : भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव येथे माजलगाव तालुक्यातील दिव्यांगांकरिता मोफत कृत्रिम हात, पाय, स्प्लीट, कॅलीपर्स मोजमाप व तात्काळ (ऑन द स्पॉट) वितरण शिबीर संपन्न झाले. याप्रसंगी व्यासपीठावर श्रीमती ज्योत्स्ना मुळीक गटविकास अधिकारी, पंचायत समिती माजलगाव,डॉ.गजानन होन्ना उपप्राचार्य डॉ. रुपेश जाधव समन्वयक एस आर ट्रस्ट, डॉ. रुक्मिणी सोनेवार,डॉ.राज शर्मा सदस्य एस आर ट्रस्ट,दत्ता क्षीरसागर तालुका उपाध्यक्ष सक्षम, सचिन जाधवर समन्वयक संवेदना प्रकल्प हे उपस्थित होते.हे शिबिर जिल्हा प्रशासन समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड, पंचायत समिती माजलगाव, रा.स्व.संघ जनकल्याण समिती (महाराष्ट्र प्रांत) समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ व एस. आर. ट्रस्ट मध्यप्रदेश अलीमको यांच्या सहयोगातून पार पडले.या शिबिरात एकूण ५४ दिव्यांगाना कृत्रिम हात,पाय व स्प्लीट, कॅलीपर्स लाभ झाला. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. याप्रसंगी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक गटविकास अधिकारी, पंचायत समिती माजलगाव यांनी आपल्या मनोगतात अशा प्रकारच्या शिबिराची समाजातील काही दिव्यांगांना खूप गरज असल्याचे स्पष्ट केले व हा उपक्रम पंचायत समिती माजलगाव आणि श्री सिद्धेश्वर महाविद्यालय यांच्या प्रयत्नातून संपन्न होत असल्याने मला खूप आनंद होतो आहे असे स्पष्ट केले. पंचायत समितीच्या माध्यमातून दिव्यांगासाठी असणा-या विविध विकास योजनांची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली. एस आर ट्रस्ट चे डॉ.रुपेश जाधव यांनी ही योजना आमच्या ट्रस्टच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन आणि जनकल्याण समिती यांच्या सहयोगातून आम्ही मराठवाड्यातील सातही जिल्ह्यामध्ये सर्व तालुक्यांमध्ये घेत असून यामध्ये बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात हे शिबीर संपन्न होत असल्याचे सांगितले. या शिबिरामध्ये दिव्यांगांसाठी ऑन द स्पॉट म्हणजेच तात्काळ कृत्रिम हात कृत्रिम पाय या शिबिरातच बसवून देत आहोत, ज्या कृत्रिम हात पायासाठी लाखो रुपये खर्च होतात ते या शिबिराच्या माध्यमातून आम्ही मोफत देत आहोत असे सांगितले. या शिबिराचे अध्यक्ष समारोप डॉ. गजानन होंन्ना यांनी केले. यात महाविद्यालय शिक्षणासोबतच विविध समाज उपयोगी उपक्रम घेत असून त्यात हे शिबिर आहे, असे सांगितले. नजीकच्या काळात विविध प्रकारचे शिबिरे आयोजन करण्याचा मानसही त्यांनी बोलून दाखवला. या शिबिराचे सूत्रसंचालन डॉ.रमेश गटकळ आणि आभार प्रदर्शन डॉ. कमलकिशोर लड्डा सहसंयोजक सक्षम यांनी केले. या शिबिराच्या आयोजनासाठी आणि यशस्वीतेसाठी एस आर ट्रस्टची तंत्र स्नेही कामगाराची टीम,प्राचार्य प्रो.मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये संयोजक व तालुकाध्यक्ष सक्षम, दत्तात्रय क्षिरसागर तालुका उपाध्यक्ष सक्षम, अशोक थळपती मुख्याध्यापक मूकबधिर विद्यालय, दिव्यांग संघटनाचे पदाधिकारी व श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.


This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com